# <u>नियमित दिवाणी दावा क्र. १२६/२०१३</u>

श्री आनंदराव जगरु जमाले व इतर विाा श्री. गणेश विष्णु तवर व इतर

CNR No.- MHST070008462013.

## <u>निशाणी क्र.१५४ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादींच्या वतीने निशाणी क्र.१५३ वरील, दिनांक २७/११/२०२५ रोजी म्हणजेच आजरोजी वादी तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा उलटतपास न घेतल्याने त्यांचे विरुध्द उलटतपास नाही बाबत झालेला आदेश रद्द करणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादीं च्या वतीने कथन आहे की, सदर आदेश सकाळी ११.५० वाजण्याच्या सुमारास झाला आहे. त्यावेळी प्रतिवादींचे वकिल नियमित दिवाणी दावा क्र.१२६/२०१३ प्रकरणी दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड यांच्या न्यायालयात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०७ नियम ११ प्रमाणे दाखल अर्जाच्या सुनावणीकरिता उपस्थीत होते. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणी उलटतपास घेणे जमले नाही. सबब, न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

२. वादींच्या वतीने सदर अर्जाचे मागील पृष्ठावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. तसेच, न्यायाच्या दृष्टीने योग्य तो आदेश पारित करण्याबाबत विनंती केली आहे.

३. उभय पक्षकारांच्या वतीने विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २) | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

# कारणमिमांसा

## वादप्रश्न क्र.१ करीता :–

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा साठेखतानुसार खरेदीखत होवून मिळणेबाबत आहे. दावा मिळकत स्थावर मालमत्ता आहे. अभिलेखाचे अवलोकन करता वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.१५३ वर दि.१३/११/२०२५ रोजी म्हणजेच मागील तारखेस वाचून नोंदविले आहे. तसेच, प्रतिवादींच्या वतीने त्याच दिवशी शपथपत्राची प्रत स्वीकारलेबाबत नोंद आहे. त्यानंतर सदर शपथपत्रावर आजरोजी प्रथम सत्रामध्ये प्रतिवादीच्या वतीने उलटतपास नसल्याबाबत आदेश पारित केला आहे. दरम्यान तात्काळ प्रतिवादींच्या वतीने विवादित आदेश रद्द करण्याबाबत अर्ज दाखल करण्यात आला. त्यामुळे, अर्जात नमूद कथनांवर अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. उलटतपास हा पुराव्याचा उत्तम स्त्रोत आहे. नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार करता तसेच वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता उभय पक्षकारांचा उलटतपास होणे देखील आवश्यक आहे. परिणामी, न्यायनिर्णय करणे सुलभ होणार आहे. अर्ज मंजुर केल्यास वादींचे काही एक नुकसान होणार नाही तसेच वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जावून प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

## वादप्रश्न क्र.२ करीता :–

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. अर्जात नमुद कारण सदर आदेश रद्द करणेस पुरेसे आहे. प्रस्तुत अर्ज विवादित आदेश पारित झाल्यानंतर तात्काळ दाखल केला आहे. त्यामुळे, वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या

मतास आहे की, सद्यस्थीतीत खर्चाबाबत आदेश करणे न्यायाचे व योग्य नाही. सबब, मी न्यायाच्यादृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

**– आ दे श –**

१) प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.१५४ मंजूर करण्यात येतो.

२) निशाणी क्र.१५३ वर आज दि.२७/११/२०२५ रोजी, वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचा उलटतपास न घेतल्याने त्यांचे विरुध्द उलटतपास नाही, बाबत झालेला आदेश, तात्काळ संबंधित साक्षीदाराचा उलटतपास घेण्याच्या अटीवर, रद्द करण्यात येतो.

३) या अर्जाचा खर्च अंतिम निर्णय ज्याच्या पक्षात होईल, त्यास देण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.11.27 15:34:27 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक: २७/११/२०२५. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.